हा आदेश संपूर्ण जिल्हयासाठी दिनांक १९.०५.२०१५ चे ०६.०० वाजेपासून ते दिनांक ०२.०६.२०१५ चे २४.०० वाजेपर्यंत अंमलात राहील.

हा आदेश आज दिनांक १६.०५.२०१५ रोजी माझ्या सही शक्यानिशी देण्यात आला आहे.

आर.टी.इतवारे,
अपर जिल्हादंडाधिकारी, जालना
जालना, १६.०५.२०१५.

६

अपर जिल्हादंडाधिकारी यांजकडून

वाचा :- पोलीस अधिक्षक जालना यांचे पत्र जा.क्र. जिविशा/जा/का.व.सु/३७ (१) ३/ २०१५-१७७३, दि.१५.०५.२०१५.

मुंबई पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (३)

आदेश

क्र.२०१५/आरबी-डेस्क-१/पोल-१/कावि-३९३.- ज्या अर्थी माझ्या असे निदर्शनास आणून देण्यात आले आहे की, सद्या जालना शहरात विद्युत भारनियमन सुरु असल्याने जिल्ह्यातील जनतेकडून नाराजी व्यक्त होत आहे. तसेच जिल्ह्यात पाणी टंचाई मोठया प्रमाणात असल्याने विविध राजकीय पक्ष व संघटनेच्या वतीने विविध मागण्या संदर्भात धरणे मोर्चे निदर्शने, रास्तारोको, इत्यादी सर्व प्रकारची आंदोलनात्मक कार्यक्रम घेण्याची शक्यता नाकारता येत नाही.

वरील पाश्वभुमी लक्षात घेता कायदा व सुव्यवस्था अबाधित राहणेसाठी व जिल्ह्यात कोठेही अनुचित प्रकार घडु नये त्यासाठी जालना जिल्ह्यात मुंबई पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (३) लागू करणे आवश्यक आहे.

त्या अर्थी मी आर.टी.इतवारे, अपर जिल्हादंडाधिकारी, जालना मुंबई पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (३) अन्वये अधिकाराचा वापर करुन याद्वारे पाच (५) किवा अधिक व्यक्तींना जमण्यास किंवा सभा, मिरवणुका, मोर्चा, काढण्यास मनाई करीत आहे.

हा आदेश कामावरील कोणताही अधिकारी किंवा कर्मचारी यांना लागू होणार नाही. तसेच विवाह, अंत्ययात्रा आणि पोलीस अधीक्षक जालना व उपविभागातील पोलीस अधिकारी जालना, अंबड, जालना, अंबड, परतूर, भोकरदन यांनी विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणुका, सभा, मोर्चा, यांना लागू राहणार नाही.

हा आदेश संपुर्ण जिल्ह्यासाठी दिनांक १९.०५.२०१५ चे ०६.०० वाजेपासून ते दिनांक ०२.०६.२०१५ चे २४.०० वाजेपर्यंत अंमलात राहील.

हा आदेश आज दिनांक १६.०५.२०१५ रोजी माझ्या सही शिक्यानिशी देण्यात आला आहे.

आर.टी.इतवारे,
अपर जिल्हादंडाधिकारी, जालना

जालना, १६.०५.२०१५.

७

प्रमुख जिल्हा न्यायाधीश यांजकडून

वाचा :- श्री. एस.एस.आरदवाड, दुसरे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, नांदेड यांचे पत्र क्र. २४२५/२०१५, दिनांक ३०.४.२०१५ सोबत विहीत नमुन्यातील रजेचा अर्ज व त्यावरील आदेश.

आदेश

क्र./आस्था./ब-२(१)/३४६१/२०१५.- श्री. एस.एस.आरदवाड, दुसरे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, नांदेड यांना महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ मधील नियम ५० अन्वये दि. ०५.०५.२०१५ ते ०७.०५.२०१५ पर्यंत (दोन्ही दिवस धरुन) एकुण (०३) दिवसांची अर्जित रजा व रजेला जोडून दि. ०३ व ०४.०५.२०१५ या दोन दिवसांच्या सुट्टयांचा फायदा, दिनांक ०५.०५.२०१५ रोजी पासून ते दिनांक ०८.०५.२०१५ रोजीच्या कार्यालयीन वेळेपुर्वीपर्यंतच्या मुख्यालय सोडण्याच्या परवानगीसह मंजूर करण्यांत येते.

रजेवरुन परत आल्यानंतर श्री. एस.एस.आरदवाड, दुसरे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, नांदेड हे पुर्वीप्रमाणे त्याच पदावर स्थापन्न राहतील.

महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ च्या नियम ३९-ब खालील तळटीप - २ अन्वये प्रमाणीत करण्यसात येते की, श्री. एस.एस.आरदवाड, दुसरे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, नांदेड हे जर वर नमूद कालावधीत रजेवर गेले नसते तर ते त्याच पदावर स्थापन्न राहिले असते.

०२

दुसरे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, नांदेड यांच्या न्यायालयाच्या उपरोक्त कालावधीतील कार्यभार तिसरे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, नांदेड यांनी पहावा.

दुर्वाचनीय,
प्र.प्रमुख जिल्हा न्यायाधीश, नांदेड.

नांदेड, ०२ मे, २०१५.

८

प्रमुख जिल्हा न्यायाधीश यांजकडुन

पहा :- श्री. पी. ए. खिल्लारे, दिवाणी न्यायाधीश व.स्तर, कंधार यांचे पत्र क्र. ६७७/२०१५, दि. २७.०४.२०१५ सोबत विहित नमुन्यातील रजेचा अर्ज व त्यावरील आदेश.

आदेश

क्र.ब-२(१)/३४६०/२०१५.- श्री. पी. ए. खिल्लारे, दिवाणी न्यायाधीश व.स्तर, कंधार यांना महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ मधील नियम ५० अन्वये दि. ११.०५.२०१५ ते २१.०५.२०१५ पर्यंत (दोन्ही दिवस धरुन) या एकूण (११) दिवसांची अर्जित रजा, दिनांक ०८.०५.२०१५ रोजीच्या कार्यालयीन वेळेनंतर पासून ते दिनांक २२.०५.२०१५ रोजीच्या कार्यालयीन वेळेपुर्वीर्यंत मुख्यालय सोडण्याच्या परवानगीसह मंजूर करण्यात येते.

रजेवरुन परत आल्यानंतर श्री. पी. ए. खिल्लारे, दिवाणी न्यायाधीश व.स्तर, कंधार हे पुर्वीप्रमाणे त्याच पदावर स्थानापन्न राहतील.

महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ च्या नियम ३९-ब खालील तळटिप-२ अन्वये प्रमाणित करण्यात येते की, श्री. पी. ए. खिल्लारे, दिवाणी न्यायाधीश व.स्तर, कंधार हे जर वर नमूद कालावधीत रजेवर गेले नसते तर ते त्याच पदावर स्थानापन्न राहिले असते.

दिवाणी न्यायाधीश व.स्तर, कंधार यांच्या न्यायालयाच्या दिनांक ०९.०५.२०१५ व १०.०५.२०१५ रोजीचा कार्यभार श्री.आर.टी.नागरे, सह दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, कंधार यांनी, दिनांक ११.०५.२०१५ ते १७.०५.२०१५ या कालावधीत कार्यभार श्री.ए.आर.कुरेशी, सह दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, नांदेड यांनी व दिनांक १८.०५.२०१५ ते २१.०५.२०१५ या कालावधीतील कार्यभार श्री.एस.आर.पवार, दुसरे सह दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, नांदेड यांनी पहावे.वर नमुद कालावधीत दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, कंधार या आस्थपनेशी संबंधीत सर्व प्रकारच्या देयकांवर, हुंडीवर व स्वीय प्रंपची लेख्यांच्या धनादेशांवर स्वाक्षरी करुन रक्कम आहरित करण्यासाठी श्री.ए.आर.कुरेशी, सह दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, नांदेड व श्री.एस.आर.पवार, दुसरे सह दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, नांदेड यांना त्या त्या कालावधीसाठी याद्वारे प्राधिकृत करण्यांत येत आहे.

दुर्वाचनीय,
प्र. प्रमुख जिल्हा न्यायाधीश, नांदेड

नांदेड :- ०२ मे, २०१५.

९

प्रमुख जिल्हा न्यायाधीश यांजकडुन

पहा :- श्री. ए. एन. मरे, दिवाणी न्यायाधीश व.स्तर, बिलोली यांचे पत्र क्र. ८०५/२०१५, दि. २२.०४.२०१५ सोबत विहित नमुन्यातील रजेचा अर्ज व त्यावरील आदेश.

आदेश

क्र.ब-२(१)/३३३७/२०१५.- श्री. ए. एन. मरे, दिवाणी न्यायाधीश व.स्तर, बिलोली यांना महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ मधील नियम ५० अन्वये दि. २७.०४.२०१५ ते ०२.०५.२०१५ पर्यंत (दोन्ही दिवस धरुन) या एकूण (०५) दिवसांची अर्जित रजा, रजेला जोडून दिनांक २५.०४.२०१५, २६.०४.२०१५, ०३.०५.२०१५ व ०४.०५.२०१५ रोजीच्या सुट्टयाच्या फायदा, दिनांक २४.०४.२०१५ रोजीच्या कार्यालयीन वेळेनंतर पासून ते दिनांक ०५.०५.२०१५ रोजीच्या कार्यालयीन वेळेपुर्वीर्यंत मुख्यालय सोडण्याच्या परवानगीसह मंजूर करण्यात येते.

रजेवरुन परत आल्यानंतर श्री. ए. एन. मरे, दिवाणी न्यायाधीश व.स्तर, बिलोली हे पुर्वीप्रमाणे त्याच पदावर स्थानापन्न राहतील.

महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ च्या नियम ३९-ब खालील तळटिप-२ अन्वये प्रमाणित करण्यात येते की, श्री. ए. एन. मरे, दिवाणी न्यायाधीश व.स्तर, बिलोली हे जर वर नमूद कालावधीत रजेवर गेले नसते तर ते त्याच पदावर स्थानापन्न राहिले असते.

दिवाणी न्यायाधीश व.स्तर, बिलोली यांच्या न्यायालयाचे विशेष अधिकार क्षेत्रातील काम दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, नांदेड यांनी पहावे व जरुरी व तात्कालीक काम सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, बिलोली यांनी पहावे, तसेच त्यांना दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, बिलोली आस्थपनेवरील अधिकाऱ्यांच्या व कर्मचाऱ्यांच्या वेतन देयकांवर व इतर देयकांवर

हुंडी, स्वीय प्रंपची लेख्यावर स्वाक्षरी करण्याचा व धनादेश रोखीकृत करुन संबंधीत रक्कम वाटपाचा अधिकार याद्वारे प्रदान करण्यांत येत आहे.

द.उ.मुल्ला,
प्रमुख जिल्हा न्यायाधीश, नांदेड

नांदेड :- २३ एप्रिल, २०१५.

१०

प्रमुख जिल्हा न्यायाधीश यांजकडुन

पहा :- श्री. द. वि. कुटे, सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, कंधार यांचे पत्र क्र. ६८३/२०१५, दि. २९.०४.२०१५ सोबत विहित नमुन्यातील रजेचा अर्ज व त्यावरील आदेश.

आदेश

क्र./आस्था./ब-२(१)/३४५४/२०१५.- श्री. द. वि. कुटे, सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, कंधार यांना महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ मधील नियम ५० अन्वये दि. ०५.०५.२०१५ व ०६.०५.२०१५ या दोन दिवसांची अर्जित रजा व रजेला जोडून दि. ०३ व ०४.०५.२०१५ या दोन दिवसांच्या सुट्टयांचा फायदा दिनांक ०२.०५.२०१५ रोजीच्या कार्यालयीन वेळेनंतर पासून ते दिनांक ०७.०५.२०१५ रोजीच्या कार्यालयीन वेळेपुर्वीर्यंत मुख्यालय सोडण्याच्या परवानगीसह मंजूर करण्यात येते.

रजेवरुन परत आल्यानंतर श्री. द. वि. कुटे, सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, कंधार हे पुर्वीप्रमाणे त्याच पदावर स्थानापन्न राहतील.

महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ च्या नियम ३९-ब खालील तळटिप-२ अन्वये प्रमाणित करण्यात येते की, श्री. द. वि. कुटे, सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, कंधार हे जर वर नमूद कालावधीत रजेवर गेले नसते तर ते त्याच पदावर स्थानापन्न राहिले असते.

सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, कंधार यांच्या न्यायालयाच्या उपरोक्त कालावधीत जरुरी व तात्कालीन काम सह दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, कंधार यांनी पहावे.

द.उ.मुल्ला,
प्रमुख जिल्हा न्यायाधीश, नांदेड

नांदेड :- ३० एप्रिल, २०१५.

११

प्रमुख जिल्हा न्यायाधीश यांजकडुन

पहा :- श्री. एन. बी. जाधव, दिवाणी न्यायाधीश क.स्तर, उमरी यांचे पत्र क्र. १३३/२०१५, दि. २७.०४.२०१५ सोबत विहित नमुन्यातील रजेचा अर्ज व त्यावरील आदेश.

आदेश

क्र./आस्था./ब-२(१)/३४५३/२०१५.- श्री. एन. बी. जाधव, दिवाणी न्यायाधीश क.स्तर, उमरी यांना महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ मधील नियम ५० अन्वये दि. ०५.०५.२०१५ व ०७.०५.२०१५ पर्यंत (दोन्ही दिवस धरुन) एकुण (०३) दिवसांची अर्जित रजा व रजेला जोडून दि. ०३ व ०४.०५.२०१५ या दोन दिवसांच्या सुट्टयांचा फायदा दिनांक ०२.०५.२०१५ रोजीच्या कार्यालयीन वेळेनंतर पासून ते दिनांक ०८.०५.२०१५ रोजीच्या कार्यालयीन वेळेपुर्वीर्यंत मुख्यालय सोडण्याच्या परवानगीसह मंजूर करण्यात येते.

रजेवरुन परत आल्यानंतर श्री. एन. बी. जाधव, दिवाणी न्यायाधीश क.स्तर, उमरी हे पुर्वीप्रमाणे त्याच पदावर स्थानापन्न राहतील.

महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ च्या नियम ३९-ब खालील तळटिप-२ अन्वये प्रमाणित करण्यात येते की, श्री. एन. बी. जाधव, दिवाणी न्यायाधीश क.स्तर, उमरी हे जर वर नमूद कालावधीत रजेवर गेले नसते तर ते त्याच पदावर स्थानापन्न राहिले असते.

दिवाणी न्यायाधीश क.स्तर, उमरी यांच्या न्यायालयाच्या दिनांक ०३.०५.२०१५ व ०४.०५.२०१५ या कालावधीतील कार्याभार सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, भोकर यांनी व दिनांक ०५.०५.२०१५ ते ०७.०५.२०१५ या कालावधीतील कार्यभार दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, भोकर यांनी पहावे.

द.उ.मुल्ला,
प्रमुख जिल्हा न्यायाधीश, नांदेड

नांदेड :- ३० एप्रिल, २०१५.

१२

प्रमुख जिल्हा न्यायाधीश यांजकडुन

पहा :- श्री. एस. बी. म्हस्के, जिल्हा न्यायाधीश-१, नांदेड यांचे पत्र क्र. ५१३४/२०१५, दि. २८.०४.२०१५ व सोबत विहित नमुन्यातील रजेचा अर्ज वैद्यकीय प्रमाणपत्र व त्यावरील आदेश.

आदेश

क्र./आस्था./ब-१(१)/३४२१/२०१५.- श्री. एस. बी. म्हस्के, जिल्हा न्यायाधीश-१, नांदेड यांना महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ मधील नियम ६१ अन्वये दि. १३.०४.२०१५ ते २७.०४.२०१५ (दोन्ही दिवस धरुन) एकुण (१५) दिवसांची परावर्तीत रजा कार्योत्तर मंजूर करण्यात येते.

रजेवरुन परत आल्यानंतर श्री. एस. बी. म्हस्के, जिल्हा न्यायाधीश-१, नांदेड हे पुर्वीप्रमाणे त्याच पदावर स्थानापन्न ठेवण्यात येते.

महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ च्या नियम ३९-ब खालील तळटिप-२ अन्वये प्रमाणित करण्यात येते की, श्री. एस. बी. म्हस्के, जिल्हा न्यायाधीश-१, नांदेड हे जर वर नमूद कालावधीत रजेवर गेले नसते तर ते त्याच पदावर स्थानापन्न राहिले असते.

द.उ.मुल्ला,
प्रमुख जिल्हा न्यायाधीश, नांदेड

नांदेड :- २९/३० एप्रिल, २०१५.

१३

प्रमुख जिल्हा न्यायाधीश यांजकडुन

पहा :- श्री. एस. आर. पवार, दुसरे सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, नांदेड यांचे पत्र क्र. २३७५/२०१५, दि. २४.०४.२०१५ सोबत विहित नमुन्यातील रजेचा अर्ज व त्यावरील आदेश.

आदेश

क्र./आस्था./ब-२(१)/३३८२/२०१५.- श्री. एस. आर. पवार, दुसरे सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, नांदेड यांना महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ मधील नियम ५० अन्वये दि. ०५.०५.२०१५ ते ०८.०५.२०१५ (दोन्ही दिवस धरुन) या एकुण (०४) दिवसांची अर्जित रजा रजेला जोडून दिनांक ०३ व ०४.०५.२०१५ या दोन दिवसांच्या सुट्टयांचा फायदा मुख्यालय

सोडण्याच्या परवानगीसह मंजूर करण्यात येते.

रजेवरुन परत आल्यानंतर श्री. एस. आर. पवार, दुसरे सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, नांदेड हे पुर्वीप्रमाणे त्याच पदावर स्थानापन्न राहतील.

महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ च्या नियम ३९-ब खालील तळटिप-२ अन्वये प्रमाणित करण्यात येते की, श्री. एस. आर. पवार, दुसरे सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, नांदेड हे जर वर नमूद कालावधीत रजेवर गेले नसते तर ते त्याच पदावर स्थानापन्न राहिले असते.

२

दुसरे सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, नांदेड यांच्या न्यायालयाच्या उपरोक्त कालावधीतील जरुरी व तात्कालीन काम दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, नांदेड यांनी पहावे.

द.उ.मुल्ला,
प्रमुख जिल्हा न्यायाधीश, नांदेड

नांदेड :- २८ एप्रिल, २०१५.

१४

प्रमुख जिल्हा न्यायाधीश यांजकडुन

पहा :- श्री. डी. डी. ममदापुरे, जिल्हा न्यायाधीश - १, भोकर यांचे पत्र क्र. २७२/२०१५, दि. २४.०३.२०१५ सोबत विहित नमुन्यातील रजेचा अर्ज वैद्यकीय प्रमाणपत्र व त्यावरील आदेश.

आदेश

क्र./ब-५/३३८३/२०१५.- श्री. डी. डी. ममदापुरे, जिल्हा न्यायाधीश - १, भोकर यांना महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ मधील नियम ६१ अन्वये दि. ०९.०३.२०१५ ते २०.०३.२०१५ (दोन्ही दिवस धरुन) एकुण (१२) दिवसांची परावर्तीत रजा रजेला जोडून दिनांक ०८.०३.२०१५, २१.०३.२०१५ व २३.२०१५ या तीन दिवसांच्या सुट्टयांचा फायदा मुख्यालयसह सोडण्याच्या परवानगीसह मंजूर करण्यात येते.

रजेवरुन परत आल्यानंतर श्री. डी. डी. ममदापुरे, जिल्हा न्यायाधीश - १, भोकर हे पुर्वीप्रमाणे त्याच पदावर स्थानापन्न राहतील.

महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ च्या नियम ३९-ब खालील तळटिप-२ अन्वये प्रमाणित करण्यात येते की, श्री. डी. डी. ममदापुरे, जिल्हा न्यायाधीश - १, भोकर हे जर वर नमूद कालावधीत रजेवर गेले नसते तर ते त्याच पदावर स्थानापन्न राहिले असते.

द.उ.मुल्ला,
प्रमुख जिल्हा न्यायाधीश, नांदेड

नांदेड :- २८ एप्रिल, २०१५.

१५

प्रमुख जिल्हा न्यायाधीश यांजकडून

वाचा :- १. श्री. डब्लू.ए.देशमुख, दिवाणी न्यायाधीश व. स्तर, नांदेड यांचे पत्र क्र. २७२७/२०१५, दिनांक १०.४.२०१५ सोबत विहीत नमुन्यातील रजेचा अर्ज व त्यावरील आदेश.

२. श्री. डब्लू.ए.देशमुख, दिवाणी न्यायाधीश व. स्तर, नांदेड यांचे पत्र क्र. २२५९/२०१५, दिनांक २०.४.२०१५ सोबत रुजू अहवाल, वैद्यकीय प्रमाणपत्र व त्यावरील आदेश.

आदेश

क्र./आस्था./ब-२(१)/३३४०/२०१५.- श्री.डब्लू.ए.देशमुख, दिवाणी न्यायाधीश व. स्तर, नांदेड यांना महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ मधील नियम ६१ अन्वये दि. १०.०४.२०१५ ते १८.०४.२०१५ पर्यंत या एकुण (०९) दिवसांची परावर्तीत रजा कार्योत्तर मंजूर करण्यांत येते.

रजेवरुन परत आल्यानंतर श्री. डब्लू.ए.देशमुख, दिवाणी न्यायाधीश व. स्तर, नांदेड हे पुर्वीप्रमाणे त्याच पदावर कायम ठेवण्यात येते.

महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ च्या नियम ३९-ब खालील तळटीप - २ अन्वये प्रमाणीत करण्यात येते की, श्री. डब्लू.ए.देशमुख, दिवाणी न्यायाधीश व. स्तर, नांदेड हे जर वर नमूद कालावधीत रजेवर गेले नसते तर ते त्याच पदावर स्थापन्न राहिले असते.

दुर्वाचनीय,
प्र.प्रमुख जिल्हा न्यायाधीश, नांदेड.

नांदेड, २७/२८ एप्रिल, २०१५.

१६

प्रमुख जिल्हा न्यायाधीश यांजकडून

वाचा :- श्री. रा.पां.कुलकर्णी, दिवाणी न्यायाधीश क. स्तर, नायगांव (बा.) यांचे पत्र क्र. ४५९/२०१५, दिनांक २४.४.२०१५ सोबत विहीत नमुन्यातील रजेचा अर्ज व त्यावरील आदेश.

आदेश

क्र./आस्था./ब-२(१)/३३३९/२०१५.- श्री. रा.पां.कुलकर्णी, दिवाणी न्यायाधीश क. स्तर, नायगांव (बा.) यांना महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ मधील नियम ५० अन्वये दिनांक २७.०४.२०१५ ते ३०.०४.२०१५ या एकूण (०४) दिवसांची अर्जित रजा, रजेला जोडून दि. २६ व २७.०५.२०१५ रोजीच्या सुट्टयांचा फायदा व दि. २४.०४.२०१५ रोजीच्या कार्यालयीन वेळेनंतर ते दि. ३०.०४.२०१५ रोजीच्या कार्यालयीन वेळेनंतरपर्यंत मुख्यालय सोडण्याची परवानगीसह मंजूर करण्यांत येते.

रजेवरुन परत आल्यानंतर श्री. रा.पां.कुलकर्णी, दिवाणी न्यायाधीश क. स्तर, नायगांव (बा.) हे पुर्वीप्रमाणे त्याच पदावर कायम ठेवण्यात येते.

महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ च्या नियम ३९-ब खालील तळटीप - २ अन्वये प्रमाणीत करण्यसात येते की, श्री. रा.पां.कुलकर्णी, दिवाणी न्यायाधीश क. स्तर, नायगांव (बा.) हे जर वर नमूद कालावधीत रजेवर गेले नसते तर ते त्याच पदावर स्थापन्न राहिले असते.

दिवाणी न्यायाधीश क. स्तर, नायगांव (बा.) यांच्या न्यायालयाचे जरुरी व तात्कालनी काम दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, देगलूर यांनी पहावे. तसेच त्यांना दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर, नायगांव (बा.) आस्थपनेवरील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या वेतन देयकावर तसेच इतर देयकांवर हुंडी, स्वीय प्रपंची लेखे व धनादेश रोखीकृत करुन संबंधीत रक्कम वाटपाचा अधिकार यसाद्वारे प्रदान करण्यांत येत आहे.

दुर्वाचनीय,
प्र.प्रमुख जिल्हा न्यायाधीश, नांदेड.

नांदेड, २७ एप्रिल, २०१५.

१७

उपविभागीय दंडाधिकारी यांजकडून

प्रकरण दाखल दिनांक ११/०४/२०१४.

निकाली दिनांक ३०/०४/२०१५.

०१. पोलीस स्टेशन :- कोतवाली, परभणी, ता.जि.परभणी

०२ चॅप्टर केस.नं. :- ०५/२०१४ कलम ५६ (ब) मुं. पो.का. १९५१

०३. रिपोर्ट करणार अधिकारी :- आर.एन.चाटे, पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन, कोतवाली, परभणी ता.जि.परभणी

०४.जाब देणाऱ्याचे नांव :- बालाजी नामदेव साळवे वय २७ रा.अण्णाभाऊ साठे नगर, परभणी, ता.जि.परभणी.

प्रकरण क्र.२०१४/बीपीए इएक्सटीएन.- १. प्रस्तुत प्रकरणात जाब देणाऱ्याच विरुध्द कलम ५६ मु.पो.कायदयानुसार कार्यवाही करणे बाबत मा. पोलीस अधिक्षक, परभणी यांनी पोलीस निरिक्षक, पोलीस स्टेशन, कोतवाली, परभणी ता.जि.परभणी यांनी सादर केलेल्या वरील प्रकरणातील कागदपत्रांची छाननी करुन सदर प्रस्ताव त्यांचे पत्र क्र. ११८५/डिसीआरबी/हाद्दपार/ २०१४ दिनांक ११/०४/२०१४ अन्वये पुढील कार्यवाहीसाठी या कार्यालयास सादर केले आहे.

२. प्रकरण प्राप्त झाल्यानंतर प्राथमिक चौकशी करण्यासाठी उपविभागीय पोलीस अधिकारी, परभणी शहर यांना या कार्यालयाचे क्र. २०१४/बीपीए/ इएक्सटीएन/ दिनांक १२/०९/२०१४ अन्वये प्राधिकृत करण्यात आले. उपविभागीय पोलीस अधिकारी, परभणी शहर यांनी सदर प्रकरणात रितसर चौकशी करुन त्यांचे पत्र जा.क्र. ५०८५/हद्दपार बालाजी साळवे/१४ दिनांक २५/१२/२०१४ अन्वये चौकशी अहवाल सादर केला त्या अहवालानुसार प्रस्तावीत हद्दपार जाब देणार बालाजी नामदेव साळवे वय २७ रा. अण्णाभाऊ साठे नगर, परभणी, ता. जि. परभणी यास मु.पो.कायदा कमल ५६ (ब) प्रमाणे परभणी, हिंगोली, जालना, लातूर या जिल्हयातून दोन वर्षा करीता हद्दपार करणे बाबत शिफारस केली आहे. व जाब देणार यांना हद्दपार करणे आवश्यक आहे असे नमुद केले आहे.

३. तसेच जाब देणार विरुध्द खालील प्रमाणे गुन्हे नोंदविले गेले आहेत.

अ.क्रं	पोलीस स्टेशन	गु.रं.नं	कलम	सद्यस्थिती
१	कोतवाली	१८७/२०११	३८४,३८६,५०४,५०६ भादवी,	मा.कोर्टात न्यायप्रविष्ठ
२	कोतवाली	१३४/२०१३	३८४,३८५ भादवि	मा.कोर्टात न्यायप्रविष्ठ
३	कोतवाली	६०१०/२०१४	८५ (१) मुंपोका	मा.कोर्टात न्यायप्रविष्ठ
४	कोतवाली	९७/२०१४	३२३, ५०४, ५०६ भादवि	अदखलपात्र गुन्हा
५	कोतवाली	१२४/२०१४	३२३,५०४,५०६ भादवि	अदखलपात्र गुन्हा
६	कोतवाली	२०/२०११	११० सीआरपीसी	चॅप्टर केस
७	कोतवाली	०७/२०१४	११० सीआरपीसी	चॅप्टर केस

३. तद्नंतर सदर प्रकरण नोंदवून जाब देणार यांना या कार्यालयाची दि. ०९/०१/२०१५ ची कारणे दाखवा नोटीस पाठवून त्यांचे म्हणने ऐकून घेण्यासाठी संधी देण्यात आली.

४. कारणे दाखवा नोटीस जाब देणार यांच्यावर तामील झाल्यानंतर जाब देणार यांना दिनांक १९/०१/२०१५ रोजी सुनावणीस उपस्थित राहण्यासाठी सुचित करण्यात आले. परंतू सदर तारखेला जाब देणार अथवा त्यांचे विधिज्ञ गैरहजर राहिले. म्हणुन पुढील तारीख २७/१/२०१५, ३१/१/२०१५, ०९/०२/२०१५, १६/०२/२०१५, २४/०२/२०१५, २/३/२०१५, १६/०३/२०१५ ठेवण्यात आली. परंतू वरील सर्व तारखेस जाब देणार व त्यांचे विधिज्ञ सुनावणीस गैरहजर होते. म्हणुन या कार्यालयाचे दिनांक ०९/०४/२०१५ ची नोटीस देवुन दिनांक १५/४/२०१५ रोजी अंतिम सुनावणीसाठी उपस्थित राहण्यासाठी सुचित केले. सदर नोटीस त्यांना दिनांक १३/०४/२०१५ रोजी तामिल झाली. परंतू दिनांक १५/०४/२०१५ च्या पण तारखेस जाब देणार अथवा विधिज्ञ गैरहजर राहिले. म्हणुन प्रकरणात पुढील तारीख २८/०४/ २०१५ ठेवण्यात आली. त्यानुसार दिनांक २८/४/२०१५ रोजी जाब देणार यांचे विधिज्ञ ॲड इमतियाज खान यांनी तोंडी युक्तीवाद करुन उपविभागीय पोलीस अधिकारी परभणी शहर यांना सादर केलेला लेखी युक्तीवाद हेच आमचे लेखी म्हणने समजण्यात यावे असे म्हणुन जाब देणार यांना हद्दपार करण्यात येवु नये अशी विनंती केली.

जाब देणार यांचे विधिज्ञ ॲड इमतियाज खान यांनी दिनांक २८/०४/ २०१५ रोजी सादर केलेला तोंडी युक्तीवाद ऐकण्यात आला व त्यांच्या म्हणन्यानुसार उपविभागीय पोलीस अधिकारी परभणी शहर यांना सादर करण्यात आलेल्या लेखी म्हणन्याचे अवलोकन केले असता त्यांनी प्रस्तूत प्रकरणात खालील प्रमाणे लेखी युक्तीवाद केल्याचे निदर्शनास आले.

१. गैरअर्जदार हे सुसंस्कृत कुंटूंबातील व्यक्ती असून त्यांच्या विरुध्द उपरोक्त प्रमाणे गुन्हयाचा तपशिल देण्यात आलेला आहे. ते गुन्हे प्रंलबीत आहेत आणि त्यांच्यातील एका गुन्हयातून मा.न्यालयाने निर्दोष मुक्तता केलेली आहे. या व्यतिरीक्त अन्य कोणतेही प्रकरण दाखल झालेले नाही.

२. गैरअर्जदार हे मोलमजूरी करुन स्वतःचा व कुंटूंबाचा उदरनिर्वाह करतो व कुंटूंबातील कर्ता पुरुष आहे. त्यांच्या हालाचाली व कृत्य इतर व्यक्तीच्या शरीराच्या सुरक्षीतेस धोका पोहचविणारी नाही. तसेच पोलीस स्टेशन कोतवाली परभणी यांनी खोटा हद्दपारीचा प्रस्ताव पाठविलेला आला आहे. सदर प्रस्ताव हा राजकीय दबावाखाली मुद्दामहुन पाठविण्यात आलेला आहे. त्यांचा हद्दपारीचा प्रस्ताव मान्य करण्यात आल्यास त्यांचे कुंटूंबाची समाजात अब्रुनुकसान होईल. व व्यवसायावर याचे दुष्पपरिणाम होतील.

३. तसेच कायद्याप्रमाणे एखादया व्यक्ती विरुध्द फौजदारी प्रकरणे

प्रलंबीत असतांना त्याला हद्दपार करता येत नाही. अशा प्रकाचे न्याय निवाडे मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद, मुंबई यांनी बहुते प्रकरणात न्याय निवाडे व निर्देश दिलेले आहे. त्यामुळे हाद्दपारीचा प्रस्ताव नामंजूर करण्यात यावा. अन्यथा माझे व माझ्या कुंटूंबाचे आतोनात हाल होतील आणि माझ्या कुंटूंबावर उपासमारीची वेळ येईल.

४. गैरअर्जदार हा जाणूनबुजून राजकीय पक्षाचे काम न केल्यामुळे राजकीय दबावाखाली खोटा प्रस्ताव पाठविण्यात आलेला आहे. गैरअर्जदार हा ससंस्कृत कुंटूंबातील व्यक्ती असून त्यांनी कोणत्याही प्रकारचे समाज कंटक कार्य केलेले नाही आणि उपरोक्त दिलेल्या प्रमाणे गुन्हे मा.न्यायालयात न्यायप्रविष्ठ आहेत आणि आजपर्यंत गैरअर्जदाराला प्रकरणात दोषी ठरविण्यात आलेली नाही.

५. गैरअर्जदार हा २७ व ३० या वयागटातील असून उपरोक्त प्रस्ताव मान्य केल्यास त्यांच्या पुढील जीवनावर दुष्पपरिणाम होतील आणि कुंटूंबातील वडीलधाऱ्या व लहान मुलांच्या सहावासापासून त्याला वंचित रहावे लागेल. त्यामुळे त्यांच्या जीवनामध्ये वचक राहणार नाही.

६. उपरोक्त हद्दपारीचा प्रस्ताव गैरअर्जदारच्या बाबतीत लागु पडत नाहीत कारण की, एकाही प्रकरणात गैरअर्जदाराला शिक्षा झालेली नाही आणि एकही प्रकरण हा समाज विघातक कृत्यामध्ये मोडत नाही. त्यामुळे सर्व बाबीचा विचार व सहनिशा करुन उपरोक्त गैरअर्जदार विरुध्द पाठविलेले हद्दपारीचा सहानुभतीपुर्वक विचार करुन रदद करण्यात यावा अशी विनंती केली.

जाब देणार यांना एकूण (१०) संधी देण्यात आल्या. त्यांचे विधिज्ञ ॲड इमतियाज खान यांनी तोंडी युक्तीवाद केलेला युक्तीवाद केला व उपविभागीय पोलीय अधिकारी परभणी (शहर) यांना दिनांक ३०/१०/२०१४ रोजी सादर केलेले लेखी म्हणने हेचा लेखी युक्तीवाद समाज्याणात यावा असे सांगीतले ते स्वीकारुन प्रकरण निर्णयासाठी राखीव ठेवण्यात आले.

५. सबब प्रकरणात जाब देणार यांचे विरुध्द मुंबई पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ५६(१) (ब) प्रमाणे प्राप्त प्रस्ताव, उपविभागीय पोलीस अधिकरी, परभणी शहर यांचा चौकशी अहवाल व पोलीस निरिक्षक, पोलीस स्टेशन कोतवाली, परभणी यांचे अहवालानुसार जाब देणार हे अण्णाभाऊ साठे नगर, परभणी येथे राहत असुन काही स्वाभावाने अतिशय गुंड व अडदांड वृत्तीचा आहे. परभणी शहरात शरीरा विरुध्द गंभीर गुन्हे करण्याचे सवयीचे असुन गैर कायदयाची मंडळी जमा करणे चिथावणी देऊन गुन्हे करणे, अगर प्रत्यक्ष गुन्हयात सहभागी होणे. शरीरा विरुध्द गंभीर अपराध करण्याचे सवयीच असुन स्वभवाने कुर कपटी असुन कायद्याला जुमानात नाही. शासकीय कर्मचाऱ्यांना पण धमक्या देऊन सरकारी कामात अडथळा निर्माण करतो व ॲट्रोसीटीची धमक्या देतो.

त्यामुळे सर्वसामान्य गोरगरीब लोक त्याचे दडपशाहीखाली दबुन राहतात व त्यांचे विरुध्द उघडपणे कोणी साक्ष देत तक्रार पण नोंदवित नाही. किरकोळ कारणावरुन भांडणे करुन स्वतःचे तसेच दुसऱ्याच्या भांडणात हस्तक्षेप करुन चिथावणी देऊन गंभीर स्वरुप निर्माण करतात. शरीराविरुध्दचे गुन्हे करण्यासाठी कट रचण्याचे कारस्थान कारतात. वेळ प्रसंगी सरकारी नौकरावर देखील दडपशाही करतात.

तसेच जाब देणार हा नेहमी चार ते पाच लोकांना सोबत घेवुन फिरत असतो. परभणी शहरात व परिसरात दहशत निर्माण करतो त्यामुळे त्याच्या विरुध्द कोणीही सामान्य व्यक्ती तक्रारी नोंदवित नाहीत, त्याच्या विरुध्द विविध कलमा खाली व वेगवेगळे दखलपात्र तसेच अदखलपात्र असे एकुण ०७ (सात) गुन्हे दाखल आहेत. जाब देणार यांच्या विरुध्द न्यायालयामध्ये प्रलंबीत असलेल्या खटल्यामध्ये भिती पोटी कोणीही साक्ष देण्यास येत नाही. म्हणुन दिर्घावधी पासुन त्यांच्या विरुध्दचे खटले मा.न्यायालयात सुनावणीसाठी प्रलंबीत आहेत. जाब देणार हे तथाकथीत गुंड, भांडखोर, कट कारस्थान रचुन गुन्हे करण्याचे सवयीचा आहे. नागरीक व शासकीय कर्मचाऱ्यामध्ये दहशत व समाजात तणाव निर्माण करुन वेळ प्रसंगी सरकारी नोकरावर हल्ला करण्याच्या वृत्तीचा आहे. त्यांच्या दहशतीमुळे घटना स्थळाच्या आजुबाजूचे कोणीही नागरीक त्याच्या विरुध्द साक्ष देण्यास किंवा तक्रार देण्यास धजावात नाही.

जाब देणार विरुध्द वरील प्रमाणे शरीराविरुध्द गंभीर गुन्हे दाखल होऊन ही तसेच प्रतिबंधात्मक कारवाई करुनही त्यांचे गुंड वृत्तीचा वर्तणुकीत काही एक फरक पडलेला नाही. उलट त्याच्याकडुन नजीकच्या काळात शरीराविरुध्दचे गंभीर गुन्हे घडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

जाब देणार यांच्या अशा कृत्यामुळे सार्वजनीक शांतता भंग होवुन कायदा व सुव्यवस्था निर्माण होण्याची शक्यता आहे. अशा ईसमाच्या वर्तनुकीस वेळीच आळा घालुन परभणी शहर व परसरातील नागरीकांच्या जिवीत व मालमत्तेचे संरक्षण करणे आवश्यक आहे. अशी कारवाई केल्यास त्यांचे वर्तुनूकीस वेळीच आळा बसुन लोकांच्या जिवीताचे तसेच मालमत्तेचे संरक्षण व शांतता प्रस्थापीत होईल.

जाब देणार यांना मु.पो.का.कलम ५६ (१) (ब) प्रमाणे ह्द्दपार करण्याची शिफारस का करण्यात येवु नये म्हणुन चौकशी अधिकारी यांनी त्यांचे पत्र क्र. ५०८५/२०१४ दिनांक ०९/१०/२०१४ अन्वये नोटीस पाठविण्यात आली असता जाब देणार यांनी दिनांक ३०/१०/२०१४ रोजी त्याचे विधिज्ञ मार्फत नोटीसचे उत्तर सादर केले. सदर नोटीसमध्ये जाब देणार यांनी त्यांच्या उपस्थितीमुळे समाजामध्ये कोणत्याही प्रकरची असुरक्षितता व परिसरातील लोकांना कोणत्याही प्रकारचा धोका नाही व त्याने कोणत्याही प्रकारचे समाज विघातक कृत्य केलेले नाही. व त्याच्यावर दाखल झालेले गुन्हे हे समाज विघातक कृत्य ठरत नाही वैगेरे म्हणने सादर केले. त्यांचे म्हणने योग्य वाटत नाही. कारण जाब देणार याचे विरुध्द भा.द.वि.चे प्रकरण १२ व १७ मधील गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल आहेत. ज्यात कलम ३८४, ३८५, ३८६, ३२३, ५०४, ५०६ भा.द.वि. व मुंप्रोका क्र..८५ (१) प्रमाणे गुन्हे दाखल आहेत. त्याच्ये अशा गुन्ह्याच्या कृत्यामुळे तसेच जाब देणार याचे दारुच्या व्यवसनामुळे त्यांच्याकडून परत शरीरा विरुध्दचा गंभीर गुन्हा घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. सदर इसमाची वृती समाजातील शांतता व सुव्यवस्थेस घातक आहे म्हणुन त्यांना हद्दपार करणेचे मत व अभिप्राय अहवालात नमुद करुन जाब देणार यांना हद्दपार करणेसबंधी स्वंयस्पष्ट अहवाल सादर केला आहे.

जाब देणार यांच्या विरुध्द सहारय्यक पोलीस अधिक्ष उपविभाग परभणी शहर यांनी सादर केलेला अहवाल पाहून मी या निर्णयप्रत पोहचलो आहे की, जाब देणार यांचे वर्तणुकीत सुधारणा होण्याची शकत्या नाही.तो शरीराविरुध्द व मालमत्तेबाबात गुन्हे करुन शांतता भंग करुन दहशतीचे वातावरण निर्माण करीत आहे.

जाब देणार यांच्या हालचाली किंवा कृत्य ही इतर व्यक्तींच्या शरीराच्या किंवा मालमत्तेच्या सुरक्षिततेस धोका पोचविणारी असून त्यांना मुंबई पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ५६ मधील तरतूदीनुसार जाब देणार इसम नामे देणार बालाजी नामदेव साळवे रा.अण्णाभाऊ साठे नगर, परभणी, ता.जि.परभणी यांना परभणी हिंगोली,जालना,लातूर जिल्ह्यातून दोन वर्षाकरिता हद्दपार करणे बाबत शिफारस करण्यात आली आहे. या शिफारशीच्या अनुषंगाने जाब देणार यांना चौकशी संदर्भात नोटीस देण्यात आली,

सुनावणीची संधी देण्यात आली, तसेच विधिज्ञ ॲड. इमतियाज खान यांना वेळोवेळी लेखी म्हणने सादर करणेसाठी संधी देण्यात आली आहे. त्यांनी उपविभागीय पोलीस अधिकारी परभणी शहर यांना दिलेला लेखी युक्तीवाद वरील परिच्छेदात नमुद प्रमाणे युक्तीवाद समजाण्यात यावा असे सांगीतले सदर लेखी युक्तीवाद अंत्यत बारकाईने वाचुन विचारात घेण्यात आले.

जाब देणार यांनी त्यांचे युक्तीवादात त्यांना हदद्पार का करण्यात येवु नये ? याचे कोणतेही ठोस कारण दिले नाही. उलट त्यांनी त्यांच्यावर नोंद झालेल्या गुन्ह्याबाबत कबुली दिलेली आहे. सदर गुन्हे दाखल आहेत हे ते मान्य करतात. सर्व साधारणपणे सामान्य व्यक्तीवर असे अर्धा डझन गुन्हे दाखल होत नाहीत.

त्याअर्थी जाब देणार यांचे दाखल गुन्ह्याचे अवलोकन केले असता सन २०११ मध्ये २ गुन्हे, २०१३ मध्ये १ गुन्हा, २०१४ मध्ये ४ गुन्हे, असे एकुण ०७ गुन्हे दाखल आहेत. यावरुन असे दिसते की, सर्वसाधारणपणे प्रत्येक वर्षी कोणता ना कोणता गुन्हा जाब देणार यांच्यावर दाखल आहेत. जाब देणार यांच्या दहशतीमुळे कित्येक क्षतीग्रस्त लोकांनी त्याच्या विरुध्द तक्रारी नोंदविलेल्या नाहीत व त्याच्या भिती पोटी मा. न्यायालयात साक्ष देण्यासाठी कोणी पुढे येत नसल्यामुळे दिर्घावधी पासुन त्याच्या विरुध्दचे खटले मा. न्यायालयात प्रलंबीत आहेत.

जाब देणार यांचे विधिज्ञ यांनी दिलेल्या लेखी युक्तीवादात सदर गुन्हे हे राजकीय दबावाखाली मुद्दामहुन केल्याचे म्हणने ग्राह्य धरता येणार नाही. संबंधीत पोलीस स्टेशन हे जाब देणार यांचे विरुध्द षडयंत्र करुन गुन्हे दाखल करील ही बाब शक्य नाही. तसेच जाब देणार यांनी ते सुसंस्कृत कुंटूबातील असुन कोणत्याही प्रकारचे समाजकंटक कार्य करत नाही तसेच ते मोलमजूरी करुन स्वतःचा व कुंटूंबाचा उदरनिर्वाह करतो व कुंटूंबातील कर्ता पुरुष आहे. त्यांच्या हद्दपारीचा प्रस्ताव मान्य करण्यात आल्यास त्यांचे कुंटूबाची समाजात अब्रुनुकसान होईल. त्यांचे हे म्हणने त्यांच्यावरील गुन्ह्याचे स्वरुप पाहता योग्य वाटत नाही. जाब देणार हे खरेच सुसंस्कृत असले असते तर त्यांच्यावर अर्धाडझन गुन्हे दाखल झाले नसते. त्यामुळे जाब देणार यांचे लेखी युक्तीवादात जी काही बाजु मांडली आहे त्यात काहीही तथ्यांश नाही म्हणुन तो मान्य करता येणार नाही.

मु.पो.का. १९५१ चे कलम ५६ अ नुसार ज्या व्यक्तिच्या हालचाली किंवा कृत्य हे जनतेस किंवा त्याच्या मालमत्तेस भय, धोका, हानी किंवा इजा निर्माण करेल किंवा करण्याचा संभव आहे असा व्यक्ती हदद्पार करणे आवश्यक आहे. जाब देणार यांना हदद्पार न केल्यास परभणी शहर व जिल्ह्यातील अनेक लोकाना विशेषतः तो ज्या परिसरात राहतो त्या परीसरातील लोकांना त्यांचे दहशतीखाली ठेवणे असे होईल. जाब देणार यांचे वर नमुद वर्तन पाहता तो हदद्पार करण्यास पात्र आहे व त्याला कायद्याने हदद्पार करणे अनिवार्य आहे.

सर्वसाधारण लोकांना विना भय किंवा विना धोक्याचे जीवन जगणे हा त्यांचा मुलभुत अधिकार आहे. पंरतू जाब देणार यांचे हालचाली व कृत्य यामुळे त्या परिसरातील लोक दहशती व दडपशाहीखाली राहतात असे माझे मत बनले आहे. मी या निष्कर्षापर्यंत आलो आहे की, जाब देणार यांना हदद्पार केले पाहिजे. मु.पो.का. १९५१ चे कलम ५६ चे अवलोकन व वाचन केले तरी ही बाब अधोरेखीत होते.

म.पो.अधिनियम १९५१ चे कलम ५६ - अपराध करण्याच्या बेतात असलेल्या व्यक्तींना घालवून देणे- महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ५६ (अ) नुसार कोणत्याही व्यक्तिच्या हालाचाली किंवा कृत्य ही व्यक्तीस किंवा मालमत्तेस भय, धोका किंवा इजा निर्माण करतील किंवा त्यापासुन भय, धोका किंवा इजा निर्माण होण्याचा संभव आहे. तसेच ५६ (ब) मध्ये अशी व्यक्ती जबरीचा किंवा बळाचा उपयोग करण्याचा ज्यात अंतर्भाव होईल असा अपराध किंवा भारतीय दंड संहितेतील प्रकरण बारा, सोळा किंवा सतरा या अन्वये शिक्षेस पात्र असा अपराध करीत आहे किंवा करण्याच्या बेतात आहे किंवा कोणताही असा अपराध करण्यास अपप्रेरणा देत आहे, किंवा देण्याच्या बेतात आहे. तसेच तो शरीराच्या किंवा मालमत्तेच्या सुरक्षिततेस धोका पोचवण्याच्या भितीमुळे जाहिरीत्या अशा व्यक्तीविरुध्द साक्ष देण्याकरिता पुढे येण्यास साक्षीदार तयार नाहीत. अशा बाबतीत महाराष्ट्र राज्यातील एक किंवा अधिक क्षेत्रांमधुन (मग ती क्षेत्र त्या अधिकाऱ्याच्या स्थानिक अधिकारितेतील असोत किंवा नसोत आणि ती लगतची आसोत किंवा नसोत) आणि अशा मार्गाने आणि अशा वेळेच्या आत निघुन जाण्याबद्दल निदेश देता येईल आणि त्याला जेथून निघुन जाण्याबद्दल निदेश देण्यात आला असेल अशा विनिर्दीष्ट क्षेत्रात किंवा क्षेत्रांमध्ये पुन्हा प्रवेश न करण्याबद्दल किंवा न परतण्याबद्दल निदेश देता येईल असे नमुद आहे.

वरील बाबीवर जाब देणार यांच्या हालचाली किंवा कृत्य ही इतर व्यक्तींच्या शरीराच्या किंवा मालमत्तेच्या सुरक्षिततेस धोका पोहचवणारी असून त्यांना मुंबई पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ५६ (१) (ब) प्रमाणे हिंसा व भय (किंवा असे बाधक कृत्य) यास प्रतिबंध व्हावा म्हणून महाराष्ट्र राज्यातील एक किंवा अधिक क्षेत्रामधून आणि अशा मार्गाने आणि अशा वेळेच्या आत जाण्याबद्दल निर्देश देणे क्रमप्राप्त आहे. कारण जाब देणारा यांच्यामुळे लोकांचे जिवीतास व मालमत्तेस हानी पोहचेल असे चौकशीअंती माझे मत बनले आहे. माझे मते जाब देणाऱ्याचे दहशतीमुळे व भितीमुळे जाहिररित्या साक्ष देण्यासाठी कोणीही पुढे येण्यास तयार नाहीत, त्यांचे मुळे लोकांच्या जिवीतास व मालमत्तेस हानी पोहचण्याची जास्त शक्यता व संभव आहे. त्यांच्या या कृत्यास आळा घालणे व प्रतिबंध करणे आवश्यक आहे. जाब देणार यांनी सादर केलेले लेखी म्हणने हे संयुक्तिक वाटत नसल्याने यांना **परभणी जिल्ह्यातील / उपविभागातील शांतता सुव्यवस्था राखण्यासाठी तसेच जनतेच्या जिवीताचे आणि मालमत्तेची हानी टाळण्यासाठी त्यांना हद्दपार करणे आवश्यक आहे या निषकर्षापर्यंत मी आलो आहे** म्हणुन मी सुभाष शिंदे, उपविभागीय दंडाधिकारी, परभणी खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

आदेश

१. गैरअर्जदार बालाजी नामदेव ~~साळ~~वे वय २७ रा. अणाभाऊ साठे नगर, परभणी, ता.जि.परभणी . यांना फक्त परभणी जिल्ह्यामधून १ (एक) वर्षाकरिता आदेशाच्या दिनांकापासून हद्दपार करण्यात येते.

२. गैरअर्जदार यांनी उक्त कालावधीत त्यांचे विरुध्दचा आदेश अंमलात असेपर्यत ते राज्यातील इतर कोणत्याही क्षेत्रात राहतील, तेव्हा त्यांचे पत्यामध्ये कोणताही बदल झालेला नसला तरी प्रत्येक महिन्यात एकदा सर्वात जवळच्या पोलीस ठाण्यात प्रभारी अधिकाऱ्यास आपले रहाण्याचे ठिकाण कळवावे.

सुभाष शिंदे
उपविभागीय दंडाधिकारी, परभणी

परभणी :- ३० एप्रिल, २०१५.

१८

उपविभागीय दंडाधिकारी अधिकारी यांजकडून

प्रकरण दाखल दिनांक १०/०९/२०१४.

निकाली दिनांक ३०/०४/२०१५.

०१. पोलीस स्टेशन :- नवामोंढा, परभणी, ता.जि.परभणी

०२ चॅप्टर केस.नं. :- १२/२०१४ कलम ५६ (अ) (ब) मुं. पो.का. १९५१

०३. रिपोर्ट करणार अधिकारी :- महेश लांडगे, सहा. पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन, नवामोंढा, परभणी ता.जि.परभणी

०४.जाब देणाऱ्याचे नांव :- काशिनाथ विठ्ठलराव डोंबे वय ४२, रा. खानापूर फाटा जवळ, दत्तधाम, वसमतरोड परभणी, ता.जि.परभणी.

प्रकरण क्र.२०१४/बीपीए इएक्सटीएन.- १. प्रस्तुत प्रकरणात जाब देणाऱ्याचे विरुध्द कलम ५६ (अ) (ब) मु.पो.कायदयानुसार कार्यवाही करणे बाबत मा. पोलीस अधिक्षक, परभणी यांनी पोलीस सहा. पोलिस निरिक्षक, पोलीस स्टेशन, नवामोंढा, परभणी ता.जि.परभणी यांनी सादर केलेल्या वरील प्रकरणातील कागदपत्रांची छाननी करुन सदर प्रस्ताव त्यांचे पत्र क्र. ३४६०/डिसीआरबी/हाद्दपार/२०१४ दिनांक ०८/०९/२०१४ अन्वये पुढील कार्यवाहीसाठी या कार्यालयास सादर केले आहे. प्रकरण प्राप्त झाल्यानंतर प्राथमिक चौकशी करण्यासाठी उपविभागीय पोलीस अधिकारी, परभणी शहर यांना या कार्यालयाचे क्र. २०१४/बीपीए/इएक्सटीएन/१० दिनांक ०४/१०/२०१५ अन्वये प्राधिकृत करण्यात आले. उपविभागीय पोलीस अधिकारी, परभणी शहर यांनी सदर प्रकरणात रितसर चौकशी करुन त्यांचे पत्र जा.क्र. ३२४/हद्दपार/ काशिनाथ डोंबे/१४ दिनांक २७/०१/२०१४ अन्वये चौकशी अहवाल सादर केला त्या अहवालानुसार प्रस्तावीत हद्दपार जाब देणार काशिनाथ विठ्ठलराव डोंबे वय ४२ रा. खानापूर फाटा जवळ, दत्तधाम, वसमत रोड, परभणी ता.जि.परभणी, यास मु.पो. कायदा कलम ५६ (ब) प्रमाणे परभणी, हिंगोली, जालना, लातूर या जिल्ह्यातून दोन वर्षाकरिता करीता हद्दपार करणे बाबत शिफारस केली आहे व जाब देणार यांना हद्दपार करणे आवश्यक आहे असे नमुद केले आहे.

२. तसेच जाब देणार विरुध्द खालील प्रमाणे गुन्हे नोंदविले गेलेले आहेत

अ.क्रं	पोलीस स्टेशन	गु.रं.नं	कलम	सद्यस्थिती
१	नवामोंढा	३०८३/२०१३	१२ (अ) मुं.जु.का.	मा.कोर्टात न्यायप्रविष्ठ
२	नवामोंढा	३०३४/२०१४	१२ (अ) मुं.जु.का.	मा.कोर्टात न्यायप्रविष्ठ
३	नवामोंढा	३०३५/२०१४	१२ (अ) मुं.जु.का.	मा.कोर्टात न्यायप्रविष्ठ
४	कोतवाली	३०९५/२०१४	१२ (अ) मुं.जु.का.	मा.कोर्टात न्यायप्रविष्ठ
५	कोतवाली	३०९७/२०१४	११० सीआरपीसी	चॅप्टर केस/प्रतिबंध
६	नवामोंढा	१७/२०१४	११० सीआरपीसी	चॅप्टर केस/प्रतिबंध
७	नवामोंढा	११/२०१३	११० सीआरपीसी	चॅप्टर केस/प्रतिबंध

३. तद्नंतर सदर प्रकरण नोंदवून जाब देणार यांना या कार्यालयाची दिनांक ९/०१/२०१५ ची कारणे दाखवा नोटिस पाठवून त्याचे म्हणणे ऐकून घेण्यासाठी संधी देण्यात आली.

४. कारणे दाखवा नोटीस जाब देणार यांच्यावर तामील झाल्यानंतर जाब देणार यांनी विधिज्ञ ॲड. व्हि.एन.मेहत्रे मार्फत दिनांक २३/०२/२०१५ रोजी लेखी म्हणने व युक्तीवाद सादर करण्यासाठी वेळ मागितला. ती मुदत त्यांना देण्यात आली.

दिनांक ०२/०३/२०१५ रोजी जाब देणार व त्यांचे विधिज्ञ सुनावणीस गैरहजर राहीले. पुन्हा शेवटची संधी म्हणुन दिनांक १६/०३/२०१५ रोजी सुनावणी ठेवण्यात आली ज्या दिवशीही जाब देणार व त्यांचे विधिज्ञ सुनावणीस गैरहजर राहिले. त्यांनी दिनांक १६/०३/२०१५ पर्यंत लेखी अथवा तोंडी म्हणने सादर केले नाही. म्हणुन पुढील सुनावणीची तारीख ठेवण्यात आली. दिनांक ०६/०४/२०१५ रोजी जाब देणार यांचे विधिज्ञ हजर झाले व त्यांनी लेखी म्हणने सादर केले.

जाब देणार यांचे विधिज्ञ ॲड.जे.बी.गिरी यांनी दिनांक ०६/०४/२०१५ रोजी सादर केलेल्या लेखी म्हणन्याचे अवलोकन केले असता त्यांनी प्रस्तूत प्रकरणात खालील प्रमाणे लेखी युक्तीवाद सादर केला.

१. मुळात पोलीस स्टेशन कोतवाली,नवामोंढा व नवामोंढा परभणी यांनी आपल्याकडे चुकीची व दिशाभूल करणार प्रस्ताव सादर केला असुन सदरील अहवालानुसार आपल्या कार्यालयाद्वारे पाठविण्यात आलेली नोटीस ही कायदेशीरित्या तथ्यहिन असून वस्तूस्थितीला अनुसरुन नाही.

२. नोटीस मधील अ.क्र.०१ ते ०७ वर नमूद केलेली प्रकरणे गैरअर्जदार विरुध्द दाखल आहेत इथर्यंतचा मजकूर सत्य आहे. परंतू सदरील नोटीस इतर मजकूर हा खोटा व चुकीचा असल्यामुळे तो गैरअर्जदारास मान्य नाही. गैरअर्जदार विरुध्द कलम १२ (अ) मुंबई जुगार कायद्यान्वयेची प्रकरणे व ११० सीआरपीसी कायद्यान्वये प्रकरणे ही खोटी व चुकीची आहे.

३. गैरअर्जदारा विरुध्द कोणत्याही प्रकारचे गंभीर गुन्हे दाखल नाहीत असे जसे की, सार्वजनिक, वैयक्तिक मालमत्तेस, शरीरास हानी पोहचविण्याचे असे गुन्हे दाखल नाहीत. त्यामुळे जनतेच्या मालमत्तेस अथवा जिवीतास

धोका निर्माण होण्याचा प्रश्नच नाही व त्यांच्या विरुध्द प्रशासनाची कोणतीही तक्रार दाखल नाही. व त्यांनी कोणत्याही साक्षीदारास साक्ष देण्यासाठी प्रतिबंध केला नाही.

४. गैरअर्जदाराविरुध्द संबंधीत पोलीसांनी दाखल केलेल्या कोणत्याही प्रकरणात प्रत्यक्षरित्या सहभाग असल्याचे निदर्शनास आलेले नाही व काही आरोपींना पकडल्यानंतर संबंधीत आरोपींनी फक्त ते करत असलले गैरकायदशीर कृत्य हे गैरअर्जदाराच्या फायदयासाठी करत असल्याचे नमुद केले आहे, कायदयाच्या चौकटीत आरोपींनी केलेल्या आरोपास कायदेशीर मान्यता नाही व कुठलाही व्यक्ती करीत असलेले गैरकायदेशीर कृत्य एखाद्या त्रयस्थ व्यक्तीच्या फायद्यासाठी करत आहे, असे त्याचे निवेदन हे संयुक्तिक वाटत नाही. त्याच प्रमाणे एखाद्या प्रकरणात आरोपी असलेला व्यक्तीच्या कथनाला कायदयाच्या चौकटीत कोणतेही महत्व नाही.

५. गैरअर्जदाराविरुध्द नोटीसामध्ये नमुद केलेली संपुर्ण प्रकरणापैकी काही प्रकरणे ही न्यायप्रविष्ट आहेत तर काही प्रकरणापासून न्यायालयाने गैरअर्जदाराची निर्दोष मुक्तता केली असल्यामुळे सदरील प्रकरणात गैरअर्जदार हा दोषी आहे असे गृहीत धरता येणार नाही व त्यांना योग्य होणार नाही.

६. या लेखी युक्तीवादाद्वारे गैरअर्जदारास नोटीसामध्ये नमुद केल्याप्रमाणे परभणी,हिंगोली, लातूर व जालना या जिल्ह्यातून हद्दपार करण्याची कार्यवाही करणे उचित होणार नाही. करिता संबंधीत पोलीसांनी दिलेला अहवाल खारीज करण्यात यावा अशी विनंती केली.

जाब देणार यांना एकूण (४) संधी देण्यात आल्या. त्यांचे विधिज्ञ ॲड. जे.बी.गिरी यांनी सादर केलेले कागदपत्र व दिनांक ०६/०४/२०१५ रोजी सादर केलेला लेखी युक्तीवाद स्वीकारुन प्रकरण निर्णयासाठी राखीव ठेवण्यात आले.

५. सबब प्रकरणात जाब देणार यांचे विरुध्द मुंबई पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ५६ (अ) (ब) प्रमाणे प्राप्त प्रस्ताव, उपविभागीय पोलीस अधिकरी, परभणी शहर यांचा चौकशी अहवाल व पोलीस निरिक्षक, पोलीस स्टेशन नवामोंढा, परभणी यांचे अहवालावरुन जाब देणार हे खानापुर फाटा, वसमत रोड परभणी येथे राहत असुन काही स्वाभावाने अतिशय गुंड, व अडदांड वृत्तीचा आहे. तो..मटका, जुगार खेळ खेळण्याच्या लोकांकडुन पैसे घेवुन विशेषतः तरुणांना या धंदयाकडे आकर्षित करुन जनतेच्या रुपायांची लुबाडणुक करतो तसेच परभणी शहरात शरीरा विरुध्द गंभीर गुन्हे करण्याचे सवयीचे असुन गैर कायदयाची मंडळी जमा करणे चिथावुन देऊन गुन्हे करणे, अगर प्रत्यक्ष गुन्ह्यात सहभागी होणे. मटका, जुगार खेळ खेळवुन लोकांकडुन रुपये पैसे घेवुन लोकांचे कोटुंबीक राहणीमानाचा दर्जा खलावत करणे असे कृत्य करुन लोकांच्या कौटुंबीक जिवन विस्कळीत करण्यास कारणीभूत ठरुन गंभीर अपराध करण्याचे सवयीचे आहे. स्वभावाने मटका,जुगार चालविणेच्या वृतीचा असुन कायद्याला जुमानात नाही. वेळ प्रसंगी खाजगी तसेच शासकीय कर्मचाऱ्यांना पण धमक्या देऊन सरकारी कामात अडथळा निर्माण करतात. त्यामुळे सर्व सामान्य गोरगरिब लोक त्याचे दडपशाही खाली दबुन राहतात व त्याचे विरुध्द उघडपणे कोणी साक्ष देत अथवा तक्रार नोंदवित नाही. त्याचे विरुध्दचे खटले मा.न्यायालयात प्रलंबीत असलेल्या खटल्या मध्ये त्याचे भितीपोटी कोणीही साक्ष देण्यास पुढे येत नसल्याचे दिर्घावधी पासुन त्यांच्या विरुध्दचे खटले मा.न्यायालयात सुनावणीवर प्रलंबीत आहेत.

जाब देणार वरीलप्रमाणे तथाकथीत गुंड, मटका, जुगार चालविण्याचे व खेळ खेळण्याचे सवयीचा असुन समाजात लोंकाच्या कौटुंबीक जिवनात तणाव निर्माण करणारा व मटका किंग नावाने परिचित असणारा आहे. त्यांचा गुंड, मटका, जुगार चालविण्याचा व खेळ खेळविण्याच्या वृत्तीत वर्तवणुकीत काही एक फरक पडलेला नाही.

जाब देणार यांच्या अशा कृत्यामुळे सार्वजनिक शांतता भंग होवुन कायदा व सुव्यवस्था निर्माण होण्याची शक्यता आहे. अशा ईसमाच्या वर्तनुकीस वेळीच आळा बसुन लोकांच्या जीवीताचे, मटका, जुगार च्या गुन्ह्यामुळे कौटुंबिक कलह टाळण्यासाठी तसेच परभणी शहर व परीसरातील नागरीकांच्या जिवीत व मालमत्तेचे संरक्षण करणे आवश्यक आहे.

जाब देणार यांना मु.पो.का कलम ५६ (१) (ब) प्रमाणे हद्दपार करण्याची शिफारस का करण्यात येवु नये ? म्हणुन चौकशी अधिकारी यांनी त्यांचे पत्र क्र. ४३६२/२०१४ दिनांक ०९/१०/२०१४ अन्वये नोटीस पाठविण्यात आली होती. व त्यांनी नोटीसचे उत्तर सादर करण्यासाठी मुद्दत मागीतली. परंतू अद्यापर्यंत लेखी उत्तर सादर केलेले नाही. यावरुन त्यांचे उध्दटपणाचे तसेच कयदयाला न जुमानता गैर कायदेशीर कृत्य करण्योच वर्तन दिसुन येते. त्यांचे मटका, जुगार, खेळ खेळविण्याचा व खेळविण्याच्या वृत्तीत काही एक फरक पडलेला नाही. सदर इसमाची वृती समाजातील शांतता व सुव्यवस्थेत घातक आहे म्हणुन त्यांना हद्दपार करणेचे मत व अभिप्राय अहवालात नमुद करुन जाब देणार यांना हद्दपार करणेसंबधी सवंयस्पष्ट अहवाल सादर केला आहे.

जाब देणार यांच्या विरुध्द सहाय्यक पोलीस अधिक्षक उपविभाग परभणी शहर यांनी सादर केलेला अहवाल पाहून मी या निर्णयाप्रत पोहचलो आहे की, जाब देणार यांचे वर्तणुकीत सुधारणा होण्याची शक्यता नाही. त्यांचे मटका, जुगार खेळ खेळण्याच्या व खेळविण्याच्या वृत्तीला काही एक फरक पडेल असे दिसुन येत नाही, भविष्यात शरीराविरुध्द व मालमत्तेबाबत गुन्हे करुन समाजात व लोकांच्या कौंटुबीक जिवनात तणाव निर्माण करुन लोकांचे जीवन उध्दवस्त करणारा आहे.

जाब देणार यांच्या हालचाली किंवा कृत्य ही इतर व्यक्तींच्या, कौटुबींक जिवनाच्या अथवा त्यांच्या शरीराच्या किंवा मालमत्तेच्या सुरक्षिततेस धोका पोचविणारी असून त्यांना मुंबई पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ५६ मधील तरतूदीनुसार जाब देणार इसम नामे देणार काशीनाथ विठ्ठलराव डोंबे, वय. ४२, रा. खानापूर फाटाजवळ दत्तधाम, वसमत रोड, परभणी ता.जि.परभणी, यांना परभणी, हिंगोली जालना, लातूर या जिल्ह्यातून दोन वर्षाकरिता हद्यपार करणे बाबत- शिफारस करण्यात आली. या शिफारशीच्या अनुषंगाने जाब देणार यांना चौकशी संदर्भात नोटीस देण्यात आली, सुनावणीची संधी देण्यात आली, तसेच विधिज्ञ ॲड. जे.बी.गिरी, यांना वेळोवेळी लेखी म्हणने सादर करणेसाठी संधी देण्यात आली आहे. त्यांनी त्यांचे लेखी युक्तीवाद वरील परिच्छेदात नमुद प्रमाणे सादर केला तो अंत्यत बारकाईने वाचुन विचारात घेण्यात आला.

जाब देणार यांनी त्यांचे युक्तीवादात त्यांना हद्दपार का करण्यात येवू नये यांचे कोणतेही ठोस कारण दिले नाही. उलट त्यांनी त्यांच्या नोंद झालेल्या गुन्हयाबाबत कबुली दिलेली आहे. सदर गुन्हे दाखल आहेत हे ते मान्य करतात. सर्व साधारपणे सामान्य व्यक्तीवर असे अर्धाडझन गुन्हे दाखल होत नाही.

त्याअर्थी जाब देणार यांचे दाखल गुन्ह्याचे अवलोकन केले असता सन २ गुन्हे, सन २०१४ मध्ये ५ असे एकुण ०७ गुन्हे दाखल आहेत. यावरु असे दिसते की, सर्वसाधारपणे सलग वर्षी गुन्हे दाखल झाले आहेत.

पोलीस स्टेशन नवामोंढा,नवामोंढा कोतवाली या ठिकाणी सलग वर्षात

